महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पनचक्की, औरंगाबाद-४३१००२.
Maharashtra State Board of Waqfs, Panchakki, Aurangabad. 431 002
مہاراشٹر اسٹیٹ وقف بورڈ، پن چکی اورنگ آباد ۴۳۱۰۰۲
Website: www.maha...com, Email: ceomsbw@gmail.com
Tele: 0240-2401584, 2991259

NO. MSBW /Snt.277/7035/2021
रजि. क्र. 16

Date: 27 OCT 2021

पहा : १) वक्फ अधिनियम १९९५ चे कलम २५
२) श्री. जावेद करीम खान पटेल अध्यक्ष, तदर्थ समिती, दर्गाह हजरत सय्यद शाहनुर हमवी रहे, उस्मानपुरा, औरंगाबाद यांचा अर्ज दि.८/७/२०२१
३) जिल्हा वक्फ अधिकारी औरंगाबाद यांनी पत्र क्र.मरावमं/संकिर्ण विभाग/३०/२०२१/३११ दि.१७/९/२०२१
४) महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, सभा दि.०६/१०/२०२१ ठराव क्र.१९

**विषय : दर्गाह हजरत सय्यद शाहनुर हमवी रहे, उस्मानपुरा, औरंगाबाद परीसरात 'महिलांसाठी फंक्शन हॉल' बांधकामासाठी नाहरकत प्रमाणपत्र देणे बाबत**

## आदेश

दर्गाह हजरत सय्यद शाहनुर हमवी व दर्गाह शमशोद्दिन मस्जीद व खानखा, समाखाना, व कब्रस्तान, उस्मानपुरा, औरंगाबाद ही संस्था वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ३६ नुसार क्र.MSBW/ABD/९९/२००८ दि.३१/१२/२००८ अन्वये नोंदणीकृत वक्फ संस्था आहे. सदरील वक्फ संस्थेच्या व्यवस्थापन आर्थीक बाबी व दर्गाहच्या संबंधित असलेल्या वक्फ मिळकती संबंधी व्यवस्थापन समिती महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या थेट निगराणीत आहे.

सदर दर्गाह परिसरातील चमन जवळ सि.स.नं.१६३१३ पैकी ३०८७.६० चौ.फुट जागा मध्ये (G+२) 'महिलांसाठी फंक्शन हॉल' बांधण्याचे वक्फ संस्थेच्या सदस्यांनी प्रस्तावीत केले आहे. प्रस्तावित बांधकामासाठी लागणारा खर्च रक्कम रु.८८,६६,२३०/- (रु. अठ्ठयाऐंशी लाख सहासष्ठ हजार दोनशे तीस) इतका असुन यासाठी केंद्रीय वक्फ परिषद, नवी दिल्ली यांच्याकडून कर्ज (Loan) घेण्यात येणार आहे. कर्ज मंजुरीसाठी बांधकाम नाहरकत प्रमाणपत्राची आवश्यकता असुन अर्जदार यांनी या कार्यालयाचे नाहरकत प्रमाणपत्र मिळण्याकरिता संदर्भ क्र,२ अन्वये विनंती केली आहे.

जिल्हा वक्फ अधिकारी, औरंगाबाद यांनी संदर्भ क्र. ३, अन्वये अहवाल सादर केला असुन 'महिलांसाठी फंक्शन हॉल' च्या बांधकामासाठी नाहरकत प्रमाणपत्र देण्याची शिफारस केली आहे.

सदर प्रस्ताव वक्फ मंडळासमोर सादर करण्यात आला. त्यानुषंगाने वक्फ मंडळाने बैठक दि.०६/१०/२०२१ रोजी ठराव क्र.१९ अन्वये सदर बांधकामाच्या आराखडयास महानगरपालिका, औरंगाबाद यांची मान्यता घेण्यात येईल, या अटीच्या आधीन राहून सदर बांधकामासाठी वक्फ मंडळाचे नाहरकत प्रमाणपत्र देण्याचे तसेच सदरचा प्रस्ताव वक्फ मंडळामार्फत केंद्रीय वक्फ परिषद, नवी दिल्ली यांना पाठविण्याचा ठराव एकमताने मंजूर केला आहे.

वक्फ मंडळाने दिलेल्या मंजुरीनुसार उपरोक्त दर्गाह परिसरात 'महिलांसाठी फंक्शन हॉल' चे बांधकाम जिल्हा वक्फ अधिकारी, औरंगाबाद यांच्या निगराणीत करण्यासाठी संदर्भ क्र.१, मधील तरतुदीनुसार खालील अटींच्या आधिन राहून अर्जदार श्री. जावेद करीम खान पटेल अध्यक्ष, तदर्थ समिती, यांना नाहरकत प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

१. ज्या कामासाठी ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आले आहे त्या कामा व्यतिरिक्त इतर कोणतेही बांधकाम करण्यात येवु नये.

२. सदरील कामामुळे संबंधित वक्फ संस्था/वक्फ मंडळाचे मालकी हक्कात किंवा इतर कोणत्याही अधिकारात कुठलाही बदल होणार नाही व यावर वक्फ संस्था/वक्फ मंडळ यांचा म[ ]की अधिकार व इतर सर्व अधिकार राहतील.

३. सदरील कामासाठी (महापालिका व इतर) तसेच बांधकामानंतर परिचालनासाठी (अग्निशमन दलाची इ.) आवश्यक असणा-या सर्व परवानग्या त्या त्या वेळी घेण्याची जबाबदारी नाहरकत प्रमाणपत्र धारकाची राहील.

४. केंद्रीय वक्फ परिषद, नवी दिल्ली यांच्याकडून कर्ज (लोन) मंजुर करण्यासाठी आवश्यक बांधकामाच्या आराखडयास औरंगाबाद महानगरपालिकाची मान्यता घेवून त्याच्या दोन प्रती वक्फ मंडळास सादर कराव्यात.

५. 'महिलांसाठी फंक्शन हॉल' चे बांधकाम पुर्ण झाल्यानंतर लगेचच त्याच्या व्यवस्थापन व परिचालनासाठी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या ताब्यात देण्यात येईल व या संदर्भात सदरच्या नाहरकत प्रमाणपत्र धारकाला कोणतेही अधिकार प्राप्त असणार नाहीत.

६. सदरील काम पुर्ण झाल्यानंतर केलेल्या कामाचा हिशोब वक्फ मंडळात सादर करावा.

७. नाहरकत प्रमाणपत्राचे शुल्क रुपये २०००/- वक्फ मंडळात जमा करुन त्याची रितसर पावती घ्यावी.

Signature valid
Signed By:ANEES SHAIKH
Signed By:OID.2.5.4.65=a4873d08d30d44a0960b3c91a3a96af7, L=THANE, CN=ANEES

**(अनिस शेख)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ
औरंगाबाद

O/C

प्रती,

१. श्री. जावेद करीम खान पटेल अध्यक्ष, तदर्थ समिती, दर्गाह हजरत सय्यद शाहनुर हमवी रहे, उस्मानपुरा, औरंगाबाद

२. जिल्हा वक्फ अधिकारी, औरगाबाद यांना सुचित करण्यात येते की, वर नमुद दर्गाह परिसरात 'महिलांसाठी फंक्शन हॉल' चे बांधकाम आपल्या निगराणीत करुन घ्यावे. तसेच काम पुर्ण झाल्यानंतर त्या बाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

३. लेखा विभाग, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ औरंगाबाद यांना सुचित करण्यांत येते की, वरील प्रमाणे नाहरकत प्रमाणपत्राचे शुल्क रुपये २०००/- अर्जदाराकडून वसूल करावे.